प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत निधी वितरित करण्याबाबत.......

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन ज्ञापन क्रमांक कौविउ-२०२२/प्र.क्र.९६/कौशल्य-१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २५ जुलै, २०२२.

वाचा : १) वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८/दिनांक १५ मे, २००९.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१९५/ रोस्वरो-१, दिनांक ०३/०८/२०१५.
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/ रोस्वरो- १, दिनांक ०२/०९/२०१५.
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ २०१७/ प्र.क्र.२३७/ अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.
५) कौशल्य विकास़ रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०२०/ प्र.क्र. १३६/कौशल्य-१/दिनांक १० मार्च, २०२१.
६) कौशल्य विकास़ रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०२१/ प्र.क्र. ४८/कौशल्य-१/दिनांक १९ मे, २०२१.
७) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३/दिनांक ०४ एप्रिल, २०२२
८) मुख्य कार्यकारी अधिकरी,महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे दिनांक ६ जुलै, २०२२ रोजीचे पत्र.

**ज्ञापन :**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु. २२४.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून सदर निधी वितरीत करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने सं.क्र.८ येथील पत्रान्वये केली आहे.

२. उपरोक्त विनंतीस अनुसरुन, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु. २२४.९० कोटी (अक्षरी रुपये दोनशे चोवीस कोटी नव्वद लाख फक्त) इतक्या तरतूदीमधून रु. ४७.२२ कोटी (अक्षरी रुपये सत्तेचाळीस कोटी बावीस लाख फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना तात्काळ उपलब्ध करुन देऊन या संदर्भातील लेखे अद्ययावत ठेवावेत.

५. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची राहील. तसेच प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांनी घ्यावी.

६. या कार्यक्रमाकरिता होणारा खर्च मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (०८) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान (कार्यक्रम) लेखाशिर्ष (२२३० ६११८), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

७. सदरहू ज्ञापन वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,दिनांक १५ मे २००९ अधिकारांस प्रशासनिक विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन तसेच वित्त विभाग परिपत्रक ०४. एप्रिल, २०२२ मधील तरतुदींस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०७२५१३०२१४९२०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA S KHARAT

Digitally signed by SUVARNA S KHARAT
DN: CN = SUVARNA S KHARAT, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT
Date: 2022.07.25 13:06:59 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
२. सह सचिव,कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय नवी मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
७. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई,
८. कक्ष अधिकारी , प्रशा-३, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (अभियान -१ ), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.